

**ST. EUPHRASIA ELUVATHINGAL**

**1877 - 1952**

# संत युफ्रेसिया

हे देवा, आमच्या प्रेमळ पित्या, निरंतर प्रार्थना आणि तापस्वी जीवनाद्वारे पवित्रता प्राप्त करणाऱ्या संत युफ्रेसियाच्या देणगीबद्दल आम्ही खरोखर तुला धन्यवाद देतो. आई मरीयेच्या अतिप्रिय मुली, संत युफ्रेसिया, आमच्यातील प्रत्येकाला, पवित्र ख्रिस्त सभेला आणि संपूर्ण जगाला आम्ही तुझ्या स्वाधीन करितो. आमचे दुःख क्रुसाचरणी समर्पित करण्यास व दिव्य योजनांवर विश्वास ठेवून जीवनयात्रेत पुढे जाण्यास आम्हाला मदत कर. देवाचे राज्य आणि त्याचे न्याय मिळविण्यास आम्हाला शिकव. प्रार्थना व त्यागपूर्ण जीवनाद्वारे देवाच्या आणि इतरांच्या प्रेमात वाढण्यास आमचे मार्गदर्शन कर. जीवनातील प्रत्येक अडचणीत, विशेष करून या............. आवशकतेसाठी, हे संत युफ्रेसिया आम्ही तुझ्या मध्यस्थीची याचना करितो. आमेन..

१ हे आमच्या स्वर्गीय बापा....१ नमो हे कृपापूर्ण मरीये ....१ पिता पुत्र आणि पवित्रात्मा......